# कोल्हापूर जिल्हा परिषद, कोल्हापूर
## तहकुब स्थायी समिती सभा क्र.०९ सन २०१७/१८

शुक्रवार, दिनांक १०/११/२०१७

=================== ◎ ◎ ◎ ◎ ◎ ◎ ===================

**<u>कार्यवृत्तांत</u>**

कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीची तहकूब सभा शुक्रवार, दिनांक १०/११/२०१७ रोजी दुपारी ०१.०० वाजता जिल्हा परिषदेच्या स्वर्गीय वसंतराव नाईक सभागृहात आयोजीत केली होती. सदर सभेचा कार्यवृतांत खालील प्रमाण आहे.

**<u>हजर सदस्य :-</u>**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. शौमिका अमल महाडिक | अध्यक्ष तथा सभापती स्थायी समिती |
| २. | मा.सर्जेराव ज्ञानदेव पाटील | सदस्य |
| ३. | मा.सर्जेराव बंडू पाटील (पेरीडकर) | सदस्य |
| ४. | मा.अंबरिषसिंह संजय घाटगे | सदस्य |
| ५. | मा.शुभांगी रामचंद्र शिंदे | सदस्य |
| ६. | मा.विशांत सुरेश महापुरे | सदस्य |
| ७. | मा.जयवंत गुंडोपंत शिंपी | सदस्य |
| ८. | मा.युवराज दत्ताजीराव पाटील | सदस्य |
| ९. | मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले | सदस्य |
| १०. | मा.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक निंबाळकर | सदस्य |
| ११. | मा.राहुल प्रकाश आवाडे | सदस्य |
| १२. | मा.कल्लाप्पा सतुराम भोगन | सदस्य |

येणेप्रमाणे मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.पदाधिकारी, मा.समिती सदस्य व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.प्रकल्प संचालक तसेच संबधीत खाते प्रमुख, अधिकारी उपस्थित झाले व सभा कामकाजास सुरवात झाली.

**सचिव :-** मा.अध्यक्ष मा.उपाध्यक्ष विषय समितीचे सभापती, व समिती सदस्य तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी,अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, समिती सदस्य, सर्व खाते प्रमुख, उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत करतो. मा.अध्यक्ष यांच्या परवाणगीने दिनांक ०२/११/२०१७ रोजीच्या तहकुब स्थायी समिती सभेचे कामकाज सुरू करुया.

**मा.अध्यक्ष :-** उपस्थित सर्वांचे स्वागत करते तरी दिनांक ०२/११/२०१७ रोजीच्या तहकुब स्थायी समिती सभेचे कामकाज सुरू करुया.

**मा.सभापती (शिक्षण व अर्थ):-** आजच्या स्थायी सभेत दु:खवटयाचे व अभिनंदनाचे ठराव असल्यास सुचित करावे अशी सभागृहास मी विनंती करतो.

**मा.अरुणराव इंगवले:-** आजच्या स्थायी समिती सभेस कार्यकारी अभियंता (PMGSY) आलेले दिसत नाहीत त्यांना सभेची नोटीस देवून सुध्दा ते हजर रहात नाहीत. वास्तविक मा.अध्यक्ष तथा सभापती स्थायी समिती डायसवर येणेपुर्वी सर्व विभाग प्रमुख अधिकारी यांनी सभागृहात उपस्थित रहाणे आत्यावश्यक आहे तरी यापुढे सर्वांनी याची दक्षता घ्यावी.

**विषय क्र.१ :-** महत्वाचे शासन निर्णय / परिपत्रके वाचन करणे.

**कार्यकारी अभियंता (बांधकाम):-** गौण खणिज, दगड वाळू इ. बाबतचा दिनांक २३/१०/२०१७ इ.रोजीचा शासन निर्णय वाचून दाखविला.

**मा.राहुल आवाडे:-** वाळूचा दर फारच वाढला आहे.

**मा.अरुणराव इंगवले:-** आर्टीफिशिअल सॅण्ड व्हर्टीकल करून बांधकामे होणार नाहीत.

**कार्यकारी अभियंता (बांधकाम):-** यामध्ये वाढ झालेली आहे.

**मा.राहुल आवाडे:-** यावर जीएसटी किती आहे.

**कार्यकारी अभियंता (बांधकाम):-** १२ टक्के जीएसटी आहे.

**मा.अरुणराव इंगवले:-** दरामध्ये काय फरक पडला आहे.

**कार्यकारी अभियंता (बांधकाम):-** सर्वसाधारणता १० ते १५ टक्के पर्यतचा फरक पडला आहे.

**सचिव:-** मागास प्रवर्ग मराठा आरक्षण संदर्भात तीन महिने मुदत वाढ दिले बाबतचा शासन निर्णय प्राप्त झाला आहे.

**विषय क्र.२ :- विषय समिती मधील घेणेत आलेल्या महत्वाच्या विषयावर चर्चा करणे**

या बाबत कोणती चर्चा झालेली नाही.

**विषय क्र.३ :- प्रशाला शिंगणापूर येथे धावपट्टी व इतर क्रिडा सुविधा पुरविणे कामास मंजूरी मिळणे बाबत. (शिक्षण (प्राथ.)**

**मा.अध्यक्ष:-** खेळाडू विद्यार्थ्यांना नियमित सरावासाठी ४०० मिटर ट्रॅक ऐवजी सरळ उभ्या रेषेमध्ये ट्रॅक करण्याचे ठरले आहे. या नविण प्रस्तावा प्रमाणे स्थायी समितीची शिफारस घेवून जि.प. सभेची मंजूरी घेवूया.

**मा.राहुल आवाडे:-** उच्चाधिकारी समितीवर निमंत्रित सदस्य नेमणार होता त्याचे काय झाले.

**मा.अध्यक्ष:-** समितीवर कायमस्वरूपी निमंत्रित सदस्य घ्यावयाचे नसून संबधित खेळाबाबत (खोखो, कब्बडी इत्यादी) या खेळा बाबतचे ज्ञान अवगत असणाऱ्या सदस्यांना निंमत्रित केले जाईल.

**ठराव क्र. १७०** **दिनांक - १०/११/२०१७**

जिल्हा परिषद, कोल्हापूर अतंर्गत दि. १४ जून २०१४ रोजी निवासी क्रीडा प्रशाला, शिंगणापूर येथे सुरु करण्यात आली आहे. निवासी क्रीडा प्रशालेकडील मैदान सपाटीकरण करुन ४०० मिटरचा ट्रॅक तयार करणेसाठी एकूण अंदाजे रु. २.५० कोटी इतका खर्च येणार आहे. सन २०१६-२०१७ मध्ये जि.प.स्वनिधीमधून रु. ९०.०० लाख इतकी तरतुद मंजूर करण्यात आली होती त्यामधून मैदान सपाटीकरण करणेच्या कामासाठी एकूण रक्कम रु. ६४.७४ लाख इतका खर्च झालेला असून उर्वरित रु.२५.२६ लाख इतका निधी शिल्लक आहे.

सन २०१७-२०१८ मध्ये जि.प.स्वनिधी मधून रु.६०.०० लाख इतकी तरतुद मंजूर करण्यात आली आहे. यामध्ये निवासी क्रीडा प्रशाला, शिंगणापूर, ता.करवीर, जिल्हा कोल्हापूरकडील मैदान सपाटीकरण करणेत येणार आहे. तसेच सदरचा खर्च हा मैदान सपाटीकरण करणे, जि.प.खर्च खाते क्र. ४ मधून करण्यात येणार आहे.

बांधकाम विभाग, जि.प.कोल्हापूर यांचेकडून मैदान सपाटीकरण करणेसाठी आराखडा आणि इस्टीमेंट प्रमाणे काम करणेसाठी ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र. झेडपीए-२०१२/ प्र.क्र.६८०/वित्त-९, मंत्रालय मुंबई ३२, दि. १९ मार्च २०१२ अन्वये भाग -२ नुसार रक्कम रु. ५०,००,००१/-चे वरिल रकमेच्या मंजूर तरतुदीला प्रशासकिय मान्यता देणेचे अधिकार जि.प.सर्वसाधारण सभेला आहेत.

यासाठी निवासी क्रीडा प्रशाला शिंगणापूरकडील मैदान सपाटीकरण करणेसाठी सन २०१७-२०१८ मध्ये जि.प.स्वनिधीमधून रु.६०.०० लाख इतक्या रकमेच्या प्लॅन व इस्टीमेंटला शिक्षण समिती सभा दि.२५.१०.२०१७ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

विद्यानिकेतन शिंगणापूरकडे आंतरराष्ट्रीय दर्जाचे ४०० मिटर ट्रॅक बसत नसल्यामुळे निवासी क्रीडा प्रशिक्षकांच्या मागणी लक्षात घेता आणि खेळाडू विद्यार्थ्यांना नियमित सरावासाठी ४०० मिटर ट्रॅक ऐवजी सरळ उभ्या रेषेमध्ये ट्रॅक करण्याचे ठरले आहे. त्याचबरोबर सरळ रेषेमध्ये ट्रॅक पेविंग भराव कामासाठी बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूरकडून नवीन प्लॅन व इस्टीमेंट तयार करुन घेऊन काम पुर्ण करणेचे ठरले आहे. त्यामुळे सन २०१७-२०१८ मध्ये जि.प.स्वनिधीमधून मंजूर तरतुद रु. ६०.०० लाख इतक्या रक्कमेच्या कामाला प्लॅन व इस्टीमेट प्रमाणे कामास नजीकचे जि.प.सर्वसाधारण सभेची प्रशासकिय मान्यता घेणेकामी स्थायी समिती सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.अंबरिषसिंह संजय घाटगे
अनुमोदक :- मा.श्री.अरुणराव जयसिंगराव इंगवले
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.४ :- नांगरगांव ता.भुदरगड येथे रस्ते कॉक्रीटीकरण करणे कामाची रुपये ४,१९३/- महसुलात जमा असलेली रक्कम परत करणे बाबत विचार करणे. (बांधकाम विभाग)**

**ठराव क्र. १७१** **दिनांक - १०/११/२०१७**

नांगरगांव ता.भुदरगड येथे रस्ते कॉक्रीटीकरण करणे कामाचा मक्ता श्री.अशोक हरीभाऊ कदम रा.पळशिवणे ता.भुदरगड यांनी स्विकारला होता. सदर कामाची पुर्तता झाली आहे.

या कामातील सुरक्षा ठेव रक्कम रु.४,१९३/- त्यांच्या निरनिराळया बिलातुन वसुल करणेत आली होती. ती ३ वर्षावरील असलेने व्यपगत करुन महसुलात जमा करणेत आली आहे.

व्यपगत करुन महसुलात जमा करण्यात आलेली रक्कम महाराष्ट्र जि.प.व पं.स. लेखा संहिता १९६८ नियम २०९(८) नुसार मंजुरी देणेचे अधिकार स्थायी समितीचे आहेत. तरी सदरची व्यपगत करणेत आलेली रक्कम रु.४,१९३/- संबंधीत मक्तेदार श्री.अशोक हरीभाऊ कदम रा.पळशिवणे ता.भुदरगड यांना अदा करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.श्री.कलाप्पा सतुराम भोगण
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.५ :- ग्राम पंचायत बुरूडे ता.आजरा येथील चित्रानगर पुनर्वसित वसाहतीमध्ये स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेस शिफारस मिळणेबाबत. (ग्रामपंचायत विभाग)**

**ठराव क्र. १७२** **दिनांक - १०/११/२०१७**

गट विकास अधिकारी, पंचायत समिती आजरा यांचेकडील जा.क्र./पंसआ/पंचायत/कावि-२९७६/२०१७, दि. ३०/०६/२०१७ च्या पत्रान्वये ग्रामपंचायत बुरूडे, ता. आजरा येथील चित्रानगर पुनर्वसित वसाहत येथे स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेकामी प्रस्ताव सादर केलेला आहे. मा. अपर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडील पत्र क्र. कार्या/४/गावठाण/वन/आरआर/१६७४/१७, दि. ०८/०९/२०१७ या कार्यालयास प्राप्त दि. १६/०९/२०१७ अन्वये अधिसुचना प्राप्त झाली आहे. सदरचा प्रस्ताव अवलोकनी येता.

**शासन निर्णय दि. १२ फेब्रुवारी २००४ व दि. ४ मार्च २०१४ मधील तरतुदीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे.**

| चित्रानगर वसाहत | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **निकष** | **वस्तुस्थिती** |
| १ | महसुली गांव जाहीर होणे आवश्यक | आहे |
| २ | पुर्नवसीत गाव आहे / नाही | आहे |
| ३ | लोकसंख्या किमान २००० असणे आवश्यक, पाटबंधारे प्रकल्पामुळे प्रकल्प विस्थापितांच्या पुर्नवसनासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत करण्याकरीता किमान लोकसंख्या ३५० ते १००० असणे आवश्यक<br>आदिवासी व तांड भागासाठी तसेच २ गावातील ३ कि.मी पेक्षा अधिक अंतर असल्यास किमान लोकसंख्या -१००० | ३५९ |
| ४ | आर्थिक परिस्थिती - दरडोई वार्षिक उत्पन्न किमान र.रू. ३०/- असणे आवश्यक पुनर्वसितांसाठी किमान र.रू. २०/- दरडोई उत्पन्न असणे आवश्यक | १११/- |
| ६ | स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेकरीता ग्रामस्थांची मागणी आवश्यक | आहे. |
| | ग्रामपंचायत ठराव | आहे.<br>ग्रामपंचायत मासिक सभा ठराव क्र. ५, दि. २७/०४/२०१७<br>ग्रामसभा ठराव क्र.५, दि.०९/०५/२०१७ |
| | ग्रामपंचायत निवडणूक होऊन किमान २ वर्षाचा कालावधी व ग्रामपंचायत मुदत संपण्यात आधी ६ महिने | मुदत दि. ०७/०७/२०१८ रोजी संपते. |
| | गट विकास अधिकारी यांची शिफारस | आहे. |

ग्रामपंचायत बुरूडे या गावाची लोकसंख्या **१४३४** असणाऱ्या ग्रामपंचायतीमध्ये चित्रानगर वसाहतीस महसुली दर्जा देणेत आलेला आहे. चित्रानगर वसाहतीमधील ग्रामस्थांनी स्वतंत्र ग्रामपंचायतची मागणी केलेली आहे. स्वतंत्र ग्रामपंचायतीची मागणी केलेल्या गावाची लोकसंख्या **३५९** इतकी आहे.

स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेस ग्रामपंचायत बुरूडेच्या मासिक सभा व ग्रामसभा यांनी मान्यता दिलेले आहे. सदर वसाहतीमध्ये स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेकरीता गट विकास अधिकरी, पं.स. आजरा यांनी शिफारस केलेली आहे.

प्रस्तुत प्रस्तावासोबत महसुली दर्जा अधिसुचना, दोन्ही गावामधील अंतराचा दाखला, ग्रामपंचायतीकडील खर्चाची अंदाजपत्रके, समजुतीचे नकाशे, जमीन महसूल क्षेत्र व गट नंबर्सची माहितीची पुर्तता केलेली आहे.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ४ व शासनाच्या निकषानुसार प्रस्तुत प्रस्तावास स्थायी समितीची मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालयामार्फत सदरचा प्रस्ताव शासनास मान्यतेकामी सादर करणेस स्थायी समिती शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.श्री.जयवंत गुंडोपंत शिंपी
अनुमोदक :- मा.श्री.कलाप्पा सतुराम भोगण
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.६ :- ग्राम पंचायत गलगले ता.कागल येथील निवळे पुनर्वसित वसाहतीमध्ये स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेस शिफारस मिळणेबाबत. (ग्रामपंचायत विभाग)**

**ठराव क्र. १७३** **दिनांक - १०/११/२०१७**

गट विकास अधिकारी, पंचायत समिती कागल यांचेकडील जा.क्र./पंसका/पंचायत/वशी-३/१०८६/२०१७, दि. २९/०५/२०१७ च्या पत्रान्वये ग्रामपंचायत गलगले, ता. कागल येथील निवळे पुनर्वसित वसाहत येथे स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेकामी प्रस्ताव सादर केलेला आहे. मा. अपर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडील पत्र क्र.कार्या/४/गावठाण/वन/आरआर/१२१९/१७, दि.११/०७/२०१७ . या कार्यालयास प्राप्त दि. ०३/०८/२०१७ अन्वये महसुली अधिसुचना प्राप्त झाली आहे. तसेच सदरचा प्रस्ताव अवलोकनी येता.

**शासन निर्णय दि. १२ फेब्रुवारी २००४ व दि. ४ मार्च २०१४ मधील तरतुदीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे.**

| **निवळे वसाहत** | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **निकष** | **वस्तुस्थिती** |
| १ | महसुली गांव जाहीर होणे आवश्यक | आहे |
| २ | पुर्नवसीत गाव आहे / नाही | आहे |
| ३ | लोकसंख्या किमान २००० असणे आवश्यक, पाटबंधारे प्रकल्पामुळे प्रकल्प विस्थापितांच्या पुर्नवसनासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत करण्याकरीता किमान लोकसंख्या ३५० ते १००० असणे आवश्यक<br>आदिवासी व तांड भागासाठी तसेच २ गावातील ३ कि.मी पेक्षा अधिक अंतर असल्यास किमान लोकसंख्या -१००० | ४३० |
| ४ | आर्थिक परिस्थिती - दरडोई वार्षिक उत्पन्न किमान र.रू. ३०/- असणे आवश्यक पुर्नवसितांसाठी किमान र.रू. २०/- दरडोई उत्पन्न असणे आवश्यक | १३६/- |
| ६ | स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेकरीता ग्रामस्थांची मागणी आवश्यक | आहे. |
| | ग्रामपंचायत ठराव | आहे.<br>ग्रामपंचायत मासिक सभा ठराव क्र. ७४/२, दि. २८/०२/२०१७<br>ग्रामसभा ठराव क्र.५७ , दि.०२/१०/२०१६ |
| | ग्रामपंचायत निवडणूक होऊन किमान २ वर्षाचा कालावधी व ग्रामपंचायत मुदत संपण्यात आधी ६ महिने | मुदत दि. १०/०८/२०२० रोजी संपते. |
| | गट विकास अधिकारी यांची शिफारस | आहे. |

ग्रामपंचायत गलगले या गावाची लोकसंख्या **१४२३** असणाऱ्या ग्रामपंचायतीमध्ये निवळे वसाहतीस महसुली दर्जा प्राप्त आहे. निवळे वसाहतीमधील ग्रामस्थांनी स्वतंत्र ग्रामपंचायतची मागणी केलेली आहे. स्वतंत्र ग्रामपंचायतीची मागणी केलेल्या गावाची लोकसंख्या **४३०** इतकी आहे.

स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेस ग्रामपंचायत गलगले मासिक सभा व ग्रामसभा यांनी मान्यता दिलेले आहे. सदर वसाहतीमध्ये स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेकरीता गट विकास अधिकरी, पं.स. कागल यांनी शिफारस केलेली आहे.

प्रस्तुत प्रस्तावासोबत महसुली दर्जा अधिसुचना, दोन्ही गावामधील अंतराचा दाखला, ग्रामपंचायतीकडील खर्चाची अंदाजपत्रके, समजूतीचे नकाशे, जमीन महसूल क्षेत्र व गट नंबर्सची माहितीची पुर्तता केलेली आहे.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ४ व शासनाच्या निकषानुसार प्रस्तुत प्रस्तावास स्थायी समितीची मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालयामार्फत सदरचा प्रस्ताव शासनास मान्यतेकामी सादर करणेस स्थायी समिती शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.श्री.युवराज दत्ताजीराव पाटील
अनुमोदक :- मा.श्री.अंबरिषसिंह संजय घाटगे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.७ :- ग्राम पंचायत घोसरवाड ता.शिरोळ येथील वाकीनगर पुनर्वसित वसाहतीमध्ये स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेस शिफारस मिळणेबाबत. (ग्रामपंचायत विभाग)**

**ठराव क्र. १७४** **दिनांक - १०/११/२०१७**

गट विकास अधिकारी, पंचायत समिती शिरोळ यांचेकडील जा.क्र./पंसशि/पंचायत/जनरल/ वशी-३/१०५०/२०१७, दि. १०/०५/२०१७ च्या पत्रान्वये ग्रामपंचायत घोसरवाड, ता. शिरोळ येथील वाकीनगर पुर्नवसित वसाहत येथे स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेकामी प्रस्ताव सादर केलेला आहे. मा. अपर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडील पत्र क्र. कार्या/४/गावठाण/वन/आरआर/१४९७/१७, दि. १०/०८/२०१७ या कार्यालयास प्राप्त दि. २१/०८/२०१७ अन्वये अधिसुचना प्राप्त झाली आहे. सदरचा प्रस्ताव अवलोकनी येता.

**शासन निर्णय दि. १२ फेब्रुवारी २००४ व दि. ४ मार्च २०१४ मधील तरतुदीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे.**

| **वाकीनगर वसाहत** | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **निकष** | **वस्तुस्थिती** |
| १ | महसुली गांव जाहीर होणे आवश्यक | मा. जिल्हाधिकारी यांचेकडून कार्यवाहीत |
| २ | पुर्नवसीत गाव आहे / नाही | आहे |
| ३ | लोकसंख्या किमान २००० असणे आवश्यक, पाटबंधारे प्रकल्पामुळे प्रकल्प विस्थापितांच्या पुर्नवसनासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत करण्याकरीता किमान लोकसंख्या ३५० ते १००० असणे आवश्यक आदिवासी व तांड भागासाठी तसेच २ गावातील ३ कि.मी पेक्षा अधिक अंतर असल्यास किमान लोकसंख्या -१००० | ४९८ |
| ४ | आर्थिक परिस्थिती - दरडोई वार्षिक उत्पन्न किमान र.रू. ३०/- असणे आवश्यक पुर्नवसितांसाठी किमान र.रू. २०/- दरडोई उत्पन्न असणे आवश्यक | १२१/- |
| ६ | स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेकरीता ग्रामस्थांची मागणी आवश्यक | आहे. |
| | ग्रामपंचायत ठराव | आहे.<br>ग्रामपंचायत मासिक सभा ठराव क्र. १२, |

| | | |
|---|---|---|
| | | दि. २७/०४/२०१७ ग्रामसभा ठराव क्र.०७ , दि.०१/०५/२०१७ |
| | ग्रामपंचायत निवडणूक होऊन किमान २ वर्षाचा कालावधी व ग्रामपंचायत मुदत संपण्यात आधी ६ महिने | मुदत दि. ०८/०९/२०१९ रोजी संपते. |
| | गट विकास अधिकारी यांची शिफारस | आहे. |

ग्रामपंचायत घोसरवाड या गावाची लोकसंख्या **६५१५** असणाऱ्या ग्रामपंचायतीमध्ये वाकीनगर वसाहतीस महसुली दर्जा देणेची कार्यवाही मा. जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचे कार्यालयाकडून कार्यवाहीत आहे. वाकीनगर वसाहतीमधील ग्रामस्थांनी स्वतंत्र ग्रामपंचायतची मागणी केलेली आहे. स्वतंत्र ग्रामपंचायतीची मागणी केलेल्या गावाची लोकसंख्या **४९८** इतकी आहे.

स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेस ग्रामपंचायत घोसरवाडच्या मासिक सभा व ग्रामसभा यांनी मान्यता दिलेले आहे. सदर वसाहतीमध्ये स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेकरीता गट विकास अधिकरी, पं.स. शिरोळ यांनी शिफारस केलेली आहे.

प्रस्तुत प्रस्तावासोबत दोन्ही गावामधील अंतराचा दाखला ग्रामपंचायतीकडील खर्चाची अंदाजपत्रके, समजूतीचे नकाशे, जमीन महसूल क्षेत्र व गट नंबरसंची माहितीची पुर्तता केलेली आहे.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ४ व शासनाच्या निकषानुसार प्रस्तुत प्रस्तावास स्थायी समितीची मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालयामार्फत सदरचा प्रस्ताव शासनास मान्यतेकामी सादर करणेस स्थायी समिती शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.श्री.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-निंबाळकर
अनुमोदक :- मा.श्री.राहुल प्रकाश आवाडे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.८ :- सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर कडील सन २०१५-१६ चे स्थानिक निधी लेखा परिक्षण अहवाल प्रथमोत्तरे सादर करणे बाबत. (सामान्य प्रशासन)**

**ठराव क्र. १७५** **दिनांक - १०/११/२०१७**

सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर कडील सन २०१५-१६ चे स्थानिक निधी लेखा परिक्षण झाले असून एकूण २० परिच्छेद घेणेत आलेले आहेत.

सदर शकांचे प्राथमिक अनुपालन सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा कोल्हापूर यांचेकडे पाठविणे क्रमप्राप्त आहे. सदर परिच्छेदांची प्राथमिक उत्तरे संबंधिताकडुन प्राप्त करुन घेणेत आलेली आहेत. सदरचे अनुपालन स्थायी समिती सभेत अवलोकनी येवून जिल्हा परिषद सर्व साधारण सभेचे मान्यतेने सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोल्हापूर या विभागाकडे पाठविणेचे आहेत. तरी सदरचा विषय जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेसाठी स्थायी समिती शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.श्री.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.श्री. राहुल प्रकाश आवडे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.९ :- ग्रा.पं. उजळाईवाडी ता.करवीर यांना जिल्हा ग्राम विकास निधीतुन ट्रॅक्टर व ट्रॉली खरेदीसाठी कर्ज रक्कम रु. ६,००,०००/- मंजूर करणे बाबत. (ग्रामपंचायत)**

**ठराव क्र. १७६** **दिनांक - १०/११/२०१७**

खाली नमूद केले ग्रामपंचायतीला खालील अटीस अधीन राहून कर्ज मंजूरी स्थायी समिती शिफारस करत आहे.

| अ.क्र. | ग्रा. पं. व तालुक्याचे नाव | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम/मागणी रक्कम | ७५ टक्के प्रमाणे होणारी रक्कम | कर्ज मंजूरीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्राम पंचायत उजळाईवाडी तालुका करवीर | ट्रॅक्टर ट्रॉली खरेदी करणे | ८,००,०००/- | ६,००,०००/- | ६,००,०००/- |

२/- वरील ग्राम पंचायतीना खालील अटीस अधिन राहून कर्ज मंजूरीची शिफारस करणेत येत आहे.

१. ग्राम पंचायतीने एकूण अंदाजपत्रकाच्या २५% रक्कम ग्राम पंचायत स्वत:च्या फंडातून खर्च करेल, व ७५% रक्कम ही जिल्हा ग्राम विकास निधीमधून कर्ज मिळेल.
२. कर्ज ज्या कारणासाठी मंजूर केलेले आहे. त्याच कारणासाठी वापर करणेत यावा. दुसरीकडे खर्च करु नये.
३. कर्ज १० वर्षाच्या मुदतीत परतफेड करणेचे आहे. व्याजाचा दर द.सा.द.शे ५ % आहे. थकीत मुद्दल व व्याज या दोहोच्या थकलेल्या हप्त्यावर ५% खेरीज द.सा.द.शे २ % दराने दंडणीय व्याज आकारण्यात येईल.
४. कर्ज परत फेड करण्यासाठी ग्राम पंचायतीच्या अंदाजपत्रकात पुरेशी तरतुद करण्यात यावी.
५. सदर ग्राम पंचायतीचे तीन वर्षाचे सरासरी शिल्लक उत्पन्न पाहून कर्ज मंजूर करणेस शिफारस करणेत आलेली आहे.
६.सदरचे वाहन हे खरेदी केलेनंतर आरसीटीसी एक प्रत या कार्यालयाकडे सादर करणेत यावी.

ग्रामपंचायत उजळाईवाडी तालुका करवीर यांना वरील अटीस अधीन राहून ट्रॅक्टर ट्रॉली खरेदी करणे करीता जिल्हा ग्राम विकास निधी मधून कर्ज मंजूर करणेसाठी ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- मा.श्री.सर्जेराव ज्ञानदेव पाटील
अनुमोदक :- मा.सौ.शुभांगी रामचंद्र शिंदे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१० :- ग्रा.पं. म्हासुर्ली ता.राधानगरी यांना प्रा.आ.केंद्र खरेदी करीता जागा खरेदीसाठी जिल्हा ग्राम विकास निधीतुन कर्ज रक्कम रु. २,८१,०००/- लाख मंजूर करणे बाबत. (ग्रामपंचायत)**

**मा.कलाप्पा भोगण:-** सदरची जागा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नावावर केल्यावर ग्रामपंचायत पैसे भरणार काय?

**मा.राहुल आवाडे:-** हुपरी येथे नगरपालिका होणार असलेने येथील प्रा.आ.केंद्र वर्ग होणार काय?

**मा.अरुणराव इंगवले:-** होणार नाही.

**मा.मु.का.अ.:-** हुपरी प्रा.आ.केंद्राच्या कार्यक्षेत्रातील गावे या केंद्राचा लाभ घेत असलेने हे प्रा.आ.केंद्र वर्ग होणार नाही. जयसिंगपूर येथिल प्रा.आ.केंद्र तिथे नगरपालिका असून देखील सुरू आहे.

**मा.राहुल आवाडे:-** जिल्हा परिषदेच्या जागा व इमारती यांचे रेडीरेकनर प्रमाणे मुल्यांकन करणे गरजेचे आहे. इचलकरंजी येथील हवामहल बंगल्या समोरील जिल्हा परिषदेच्या जागेचे मोठे मुल्यांकन होणार आहे. याचे जिल्हा परिषदेच्या वार्षिक अहवालामध्ये नोंद घेता येईल.

**मा.अरुणराव इंगवले:-** याची गरज असल्यास मुल्याकंन करून घ्यावे.

**कार्यकारी अभियंता (बांधकाम):-** किमान मोठया व मोक्याच्या मालमत्तेचे मुल्याकंन करून घेता येईल.

**ठराव क्र. १७७** **दिनांक - १०/११/२०१७**

खाली नमूद केले ग्रामपंचायतीला खालील अटीस अधीन राहून कर्ज मंजूरी स्थायी समिती शिफारस करत आहे.

| अन | ग्राम पंचायत व तालूक्याचे नांव | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | ७५%प्रमाणे होणारी रक्कम | कर्ज मंजूरीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत म्हासुर्ली ता. राधानगरी | प्राथमिक आरोग्य केद्रासाठी जागा खरेदी | ३,७५,०००/- | २,८१,२५०/- | २,८१,०००/- |

२/- वरील ग्राम पंचायतीना खालील अटीस अधिन राहून कर्ज मंजूरीची शिफारस करणेत येत आहे.

१. ग्राम पंचायतीने एकूण अंदाजपत्रकाच्या २५% रक्कम ग्राम पंचायत स्वतःच्या फंडातून खर्च करेल व ७५% रक्कम जिल्हा ग्राम विकास निधीमधून कर्ज मिळेल.

२. कर्ज ज्या कारणासाठी मंजूर केलेले आहे. त्याच कारणासाठी वापर करणेत यावा. दुसरीकडे खर्च करु नये.

३. कर्ज १० वर्षाच्या मुदतीत परतफेड करणेचे आहे. व्याजाचा दर द.सा.द.शे ५ % आहे. थकीत मुद्दल व व्याज या दोहोच्या थकलेल्या हप्त्यावर ५% खेरीज द.सा.द.शे २ % दराने दंडणीय व्याज आकारण्यात येईल.

४. कर्ज परत फेड करण्यासाठी ग्राम पंचायतीच्या अंदाजपत्रकात पुरेशी तरतुद करण्यात यावी.

५. सदर ग्राम पंचायतीचे तीन वर्षाचे सरासरी शिल्लक उत्पन्न पाहून कर्ज मंजूर करणेस शिफारस करणेत आलेली आहे.

६. सदरची जागा ही खरेदी झालेनंतर खरेदीखताची एक प्रत या कार्यालयाकडे सादर करणेत यावी.

तरी ग्रामपंचायत म्हासुर्ली तालुका राधानगरी यांना कर्ज मंजूर करण्यासाठी व जि.प.सर्वसाधारण सभे पुढे सदरचा विषय मंजूरीस ठेवणे विषयी शिफारस करणेत यावी ही विनंती.

सुचक :- मा.श्री.जयवंत गुंडोपंत शिंपी
अनुमोदक :- मा.श्री.कलाप्पा सतुराम भोगण
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.११ :- जिल्हा ग्राम विकास निधीतुन ग्रा.पं. गारगोटी ता.भुदरगड यांना ग्रामपंचायत कार्यालय , सभागृह व दुकाणगाळे या प्रस्तावित कामास कर्ज मंजूरी बाबत र.रु.४१,१८,०००/- मंजूर करणे बाबत. (ग्रामपंचायत)**

**ठराव क्र. १७८** **दिनांक - १०/११/२०१७**

खाली नमूद केले ग्रामपंचायतीला खालील अटीस अधीन राहून कर्ज मंजूरी स्थायी समिती शिफारस करत आहे.

| अक्र | ग्रा. पं. व तालुक्याचे नाव | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम/मागणी रक्कम | ७५ टक्के प्रमाणे होणारी रक्कम | कर्ज मंजूरीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्राम पंचायत गारगोटी तालुका भुदरगड | ग्रामपंचायत कार्यालय, दुकान गाळे बांधकाम करणे | ५४,९१,५१२/- | ४१,१८,६३४/- | ४१,१८,०००/- |

२/- वरील ग्राम पंचायतीना खालील अटीस अधिन राहून कर्ज मंजूरीची शिफारस करणेत येत आहे.

१. ग्राम पंचायतीने एकूण अंदाजपत्रकाच्या २५% रक्कम ग्राम पंचायत स्वतःच्या फंडातून खर्च करेल, व ७५% रक्कम ही जिल्हा ग्राम विकास निधीमधून कर्ज मिळेल.
२. कर्ज ज्या कारणासाठी मंजूर केलेले आहे. त्याच कारणासाठी वापर करणेत यावा. दुसरीकडे खर्च करु नये.
३. कर्ज १० वर्षाच्या मुदतीत परतफेड करणेचे आहे. व्याजाचा दर द.सा.द.शे ५ % आहे. थकीत मुद्दल व व्याज या दोहोच्या थकलेल्या हप्त्यावर ५% खेरीज द.सा.द.शे २ % दराने दंडणीय व्याज आकारण्यात येईल.
४. कर्ज परत फेड करण्यासाठी ग्राम पंचायतीच्या अंदाजपत्रकात पुरेशी तरतुद करण्यात यावी.
५. सदर ग्राम पंचायतीचे तीन वर्षाचे सरासरी शिल्लक उत्पन्न पाहून कर्ज मंजूर करणेस शिफारस करणेत आलेली आहे.
६. सदरचे काम हे आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याचे आत पुर्ण करणेचे आहे.

ग्राम पंचायत गारगोटी तालुका भुदरगड यांना वरील अटीस अधीन राहून ग्रामपंचायत कार्यालय, दुकान गाळे बांधकाम करणे करीता जिल्हा ग्राम विकास निधी मधून कर्ज मंजूर करण्यासाठी ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- मा.श्री.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.श्री.युवराज दत्ताजीराव पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१२ :- वि.मं.कुमार वाकरे व वि.मं.कन्या वाकरे ता.करवीर या दोन शाळा एकत्रीकरण करणे बाबत. (प्रा.शिक्षण)**

**मा.अरुणराव इंगवले:-** या बाबत काय निकष लावले आहेत?

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक):-** १५० पेक्षा कमी विध्यार्थ्या पट संख्या असलेल्या शाळांचे एकत्रिकरण करणेत येणार आहे. या मुळे शिक्षक अन्य शाळेसाठी उपलब्ध होतील.

**मा.अरुणराव इंगवले:-** म्हणजे २९० पट असल्यास चालेल. या बाबत सर्व शाळांची माहिती घ्यावी. व शाळा एकत्रिकरण करावे.

**मा.सभापती, (शिक्षण व अर्थ ):-** यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचा विरोध होईल.

**मा.राजवर्धन निंबाळकर:-** शाळा एकत्रिकरण करणामुळे शिल्लक रहाणारे शिक्षक संबधित तालुक्यातच गरज असलेल्या शाळेमध्ये पाठवावेत.

**मा.सभापती, (म.बा.क.):-** उदगांव ता.शिरोळ येथील शाळा इमारत बांधकामा बाबत पुढे काय झाले.?

**मा.सभापती, (शिक्षण व अर्थ ):-** एम्पथी फौंडेशन यांना सदर शाळा इमारत बांधकामा बाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विनंती केली आहे. परंतू त्यांनी यामध्ये लोकसहभाग आवश्यक असलेचे कळविले आहे.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक):-** कोगे येथिल शाळेसाठी त्यांनी यापुर्वी मदत केली आहे. या बाबत पाठपुरवा करत आहे.

**मा.राहुल आवाडे:-** जवाहर साखर कारखान्याकडून या शाळेची एक खोली बांधकाम करता येईल.

**मा.सभापती, (शिक्षण व अर्थ ):-** लोकसहभाग चालतो.

**मा.मु.का.अ.:-** २० बाय २२ चा क्रायटेरीया लावतात.

**मा.सभापती, (शिक्षण व अर्थ ):-** त्यांच्या खात्यावर पैसे वर्ग करतात.

**मा.राहुल आवाडे:-** आम्ही मा.पालकमंत्री महोदयांना बांधलेली शाळा खोली दाखविलेली आहे व एवढया कमी खर्चात बांधलेली हि खोली सर्वांना आवडली आहे.

**मा.अरुणराव इंगवले:-** उदगांव शाळेसाठी मा.खासदार पैसे देणार आहे.

**मा.राजवर्धन निंबाळकर:-** संबधित मा.खासदार व मा.आमदार यांना या शाळेसाठी त्यांच्या फंडातून निधी देणे बाबत विनंती करावी.

**मा.मु.का.अ.:-** शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) यांनी एम्पथी फौंडेशन, मा.खासदार व मा.आमदार यांना तातडीने पत्रे पाठवावित.

**मा.राहुल आवाडे:-** बऱ्याच शाळांनी लाईट बिले भरलेली नाहीत व त्याची थकबाकी आहे.

**मा.सभापती, (शिक्षण व अर्थ ):-** ३५७ शाळांपैकी २८१ शाळांचे प्रस्ताव विद्युत वितरण कंपणीकडे दिलेले आहेत.

**उप कार्यकारी अभियंता (महावितरण):-** आम्ही या बाबत कार्यवाही करीत आहोत.

**मा.राहुल आवाडे:-** शासनाच्या निर्णया प्रमाणे विज बिले कमी केली जातील याची काळजी केली पाहीजे.

**उप कार्यकारी अभियंता (महावितरण):-** आपण शाळांची यादी आमच्या उप विभागांना दयावी.

**मा.मु.का.अ.:-** आपण शाळांचा कन्सेंट का घेत आहात ? प्रत्येक तालुक्यात असलेल्या शाळांच्या विज कनेक्शनची माहिती आपल्याकडे आहे. शासन निर्णया प्रमाणे आपण यानुसार दर कमी करावेत. उप कार्यकारी अभियंता (महावितरण) यांनी तालुकास्तरावर तश्या सुचना दयाव्यात.

**मा.राहुल आवाडे:-** जिल्हयातील ग्राम पंचायती, शाळा, दवाखाने व अंगणवाडया यांना विज दरामध्ये सवलत देणेची तात्काळ कार्यवाही करावी.

**मा.मु.का.अ.:-** शाळांची माहिती घेवून या बाबतची कार्यवाही विज वितरण कंपनीने स्वंयप्रेरनेने करावी.

**ठराव क्र. १७९** **दिनांक - १०/११/२०१७**

वि.मं. कुमार वाकरे व वि.मं.कन्या वाकरे ता.करवीर या दोन शाळा एकत्रिकरण करणेकरिता गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, करवीर यांच्या कडून प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

सदरच्या दोन्ही शाळा जिल्हा परिषद,कोल्हापूर च्या आहेत. तथापी वि.म.कुमार वाकरे या शाळेचा पट १८० व वि मं. कन्या वाकरे या शाळेचा पट २१५ आहे. या बाबत जि.प.सर्वसाधारण सभा दिनांक

११/७/२०१७ इ. रोजी झाले चर्चेनुसार वि.मं.कुमार व वि.मं.कन्या एकत्रीकरण कराव्यात. त्यानुसार शाळेचे एकत्रिकरण करावे असे गटशिक्षणाधिकारी करवीर यांनी प्रस्तावात सुचित केले आहे.सदर प्रस्तावात दोन्ही शाळा व्यवस्थापन समितीचा ठराव जोडलेला आहे.तसेच दोन्ही मुख्याध्यपकांनी शिफारस अर्ज सोबत जोडलेले आहेत.सदरील विषयास शिक्षण समिती सभा दि.०१/०९/२०१७ ठराव क्र. ४९ अन्वये अलाहिदा मान्यता दिलेली आहे.

स्थायी समिती सभा दि.१०/११/२०१७ अन्वये सदरच्या विषयास जि.प.सभेची मान्यता घेणेकामी शिफारस दिलेली आहे.यास अनुसरून वि.मं.कुमार वाकरे व वि.मं.कन्या वाकरे ता.करवीर या दोन शाळा एकत्रिकरणाच्या प्रस्तावास जिल्हा परिषद सभेची मंजुरी घेणेकामी स्थायी समिती सभेची शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.सर्जेराव ज्ञानदेव पाटील
अनुमोदक :- मा.श्री.सर्जेराव बंडू पाटील (पेरिडकर)
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१३ :- वि.मं.सोनाळी व वि.मं.बेघर सोनाळी ता.भुदरगड या दोन शाळा एकत्रीकरण करणे बाबत. (प्रा.शिक्षण)**

**ठराव क्र. १८०** **दिनांक - १०/११/२०१७**

वि.मं.सोनाळी व वि.मं.बेघर सोनाळी ता.भुदरगड या दोन शाळा एकत्रिकरण करणेकरिता गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, भुदरगड यांच्या कडून प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

सदरच्या दोन्ही शाळा जिल्हा परिषद, कोल्हापूरच्या आहेत. तथापी वि.मं.सोनाळी या शाळेचा पट २०५ व वि मं. बेघर सोनाळी या शाळेचा पट ०७ आहे.या बाबत जि.प.सर्वसाधारण सभा दिनांक ११/७/२०१७ इ रोजी झाले चर्चेनुसार एकाच आवारात असणाऱ्या वि.मं. शाळा एकत्रीकरण कराव्यात. त्यानुसार शाळेचे एकत्रिकरण करावे असे गटशिक्षणाधिकारी भुदरगड यांनी प्रस्तावात सुचित केले आहे. शिक्षण समिती सभा दि.०१/०९/२०१७ ठराव क्र. ५० अन्वये अलाहिदा मान्यता दिलेली आहे.

स्थायी समिती सभा दि.१०/११/२०१७ अन्वये सदरच्या विषयास जि.प.सभेची मान्यता घेणेकामी शिफारस दिलेली आहे. यास अनुसरून वि.मं.सोनाळी व वि.मं.बेघर सोनाळी ता.भुदरगड या दोन शाळा एकत्रिकरणाच्या प्रस्तावास जिल्हा परिषद सभेची मंजुरी घेणेकामी स्थायी सभेची शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.अंबरिषसिंह संजय घाटगे
अनुमोदक :- मा.श्री.शुभांगी रामचंद्र शिंदे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१४ :- वि.मं.कन्या कोथळी व वि.मं.कुमार कोथळी ता.शिरोळ या दोन शाळा एकत्रीकरण करणे बाबत.(प्रा.शिक्षण)**

**ठराव क्र. १८१** **दिनांक - १०/११/२०१७**

कन्या वि.मं.कोथळी व कुमार वि.मं.कोथळी ता.शिरोळ या दोन शाळा एकत्रिकरण करणेकरिता गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, शिरोळ यांच्या कडून प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

सदरच्या दोन्ही शाळा जिल्हा परिषद कोल्हापूरच्या आहेत. तथापी कन्या. वि. मं. कोथळी व कुमार. वि. मं. कोथळी या दोन्ही शाळा १ ली ते ४ थी पर्यन्तच्या असून एकाच आवारात आहेत. चालु वर्षी कुमार. वि. मं. कोथळी या शाळेचा पट ११३ असलेने मुख्याध्यापक पदासाठी अपात्र झाली आहे. तसेच कन्या. वि. मं. कोथळीचा पट ११४ असलेने ही शाळा सुध्दा मुख्याध्यापक पदासाठी अपात्र होऊ शकते. तथापी या दोन्ही शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामपंचायत कोथळी यांच्या ठरावानुसार एकत्रिकरण करण्यास गटशिक्षणाधिकारी पंचायत

समिती शिरोळ यांनी शिफारस केली आहे.सदरील विषयास शिक्षण समिती सभा दि.०१/०९/२०१७ ठराव क्र.५१ अन्वये अलाहिदा मान्यता दिलेली आहे.

स्थायी समिती दि.१०/१०/२०१७ अन्वये सदरच्या विषयास जि.प.सभेची मान्यता घेणेकामी शिफारस दिलेली आहे.यास अनुसरून कन्या वि.मं.कोथळी व कुमार वि.मं.कोथळी ता.शिरोळ या दोन शाळा एकत्रिकरणाच्या प्रस्तावास जिल्हा परिषद सभेची मंजुरी घेणेकामी स्थायी समिती सभेची शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.राहुल प्रकाश आवाडे
अनुमोदक :- मा.श्री.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-
निंबाळकर
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१५ :- शारदा वि.मं.वडगांव, कन्या वि.मं.वडगांव व जिवन शिक्षण वडगांव ता.हातकणंगले या तिन शाळा एकत्रीकरण करणे. (प्रा.शिक्षण)**

**ठराव क्र. १८२** **दिनांक - १०/११/२०१७**

शारदा वि.मं.वडगांव,कन्या वि.मं.वडगांव व जीवन शिक्षण वडगांव ता.हातकणंगले या तीन शाळा एकत्रिकरण करणेकरिता गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, हातकणंगले यांच्या कडून प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

सदरच्या तिन्ही शाळा जिल्हा परिषद, कोल्हापूर च्या आहेत. शारदा वि.मं.वडगांव,कन्या वि.मं.वडगांव व जीवन शिक्षण वडगांव तथापी या शाळा १ ली ते ४ थी पर्यन्तच्या असून एकाच आवारात आहेत. चालु वर्षी शारदा वि.मं.वडगांव या शाळेचा पट ७१ आहे.कन्या वि.मं. या शाळेचा पट ३५ व जीवन शिक्षण वि.मं.या शाळेचा पट ३४ आहे. तथापी या तिन्ही शाळा व्यवस्थापन समिती ठराव व मुख्याध्यापक मागणी अर्ज,पंचायत समिती हातकणंगले ठराव यांच्या ठरावानुसार एकत्रिकरण(विलिनिकरण) करण्यास गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, हातकणंगले यांनी शिफारस केली आहे.सदरील विषयास शिक्षण समिती सभा दि.०१/०९/२०१७ ठराव क्र.५९ अन्वये अलाहिदा मान्यता दिलेली आहे.

स्थायी समिती सभा दि.१०/११/२०१७अन्वये सदरच्या विषयास जि.प.सभेची घेणेकामी शिफारस दिलेली आहे.यास अनुसरून शारदा वि.मं.वडगांव, कन्या वि.मं.वडगांव व जीवन शिक्षण वडगांव या तीन शाळा एकत्रिकरणाच्या प्रस्तावास जि.प.सभेची मंजुरी घेणेकामी स्थायी समिती सभेची शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.श्री.युवराज दत्ताजीराव पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१६ :- कुमार वि.मं. शिरोली नंबर ४ व कन्या वि.मं.शिरोली नंबर २ ता.हातकणंगले यादोन शाळा एकत्रीकरण करणे. (प्रा.शिक्षण)**

**ठराव क्र. १८३** **दिनांक - १०/११/२०१७**

कुमार.वि.मं.शिरोली नं.४ व कन्या वि.मं.शिरोली नं.२ ता.हातकणंगले या दोन शाळा एकत्रिकरण करणेकरिता गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, हातकणंगले यांच्या कडून प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

सदरच्या दोन्ही शाळा जिल्हा परिषद,कोल्हापूर च्या असून प्रस्तावामध्ये कु.वि.मं.शिरोली नं.४ व कन्या वि मं. शिरोली नं.२ या दोन्ही शाळा जिल्हा परिषदेच्या असुन कु.वि.मं.शिरोली (पु) नं.४ या शाळेचा पट १८ आहे. व कन्या वि मं. शिरोली (पु) नं.२ या शाळेचा पट १३ आहे. तरी १३ डिसेंबर २०१३ या शासन निर्णयानुसार ज्या शाळांमध्ये २० पेक्षा कमी विद्यार्थी आहेत.अशा शाळेतील विदयार्थ्यांना नजीकच्या शाळेमध्ये समायेजित करण्यात यावे असे नमुद आहे. सबब RTE च्या निकषर्नुसार वस्ती मध्ये एकच शाळा असणे अनिवार्य आहे.असे

गटशिक्षणाधिकारी हातकणंगले यांनी सुचित केले आहे.तरी प्रस्तावास दोन्ही शाळा व्यवस्थापन समितीचे ठराव, दोन्ही मुख्याध्यापकाचा शिफारस अर्ज, ग्रामपंचायत ठराव,व पंचायत समिती ठराव सोबत जोडून प्रस्ताव सादर केला आहे. सदरील विषयास शिक्षण समिती सभा,दि. ०१/०९ /२०१७ ठराव क्र. ५८अन्वये अलाहिदा मान्यता दिलेली आहे.

स्थायी समिती सभा दि.१०/११/२०१७ अन्वये सदरच्या विषयास जि.प.सभेची घेणेकामी शिफारस दिलेली आहे.यास अनुसरून कुमार.वि.मं.शिरोली नं.४ व कन्या वि.मं.शिरोली नं.२ ता.हातकणंगले या दोन शाळाचे एकत्रिकरणाच्या प्रस्तावास जिल्हा परिषद सभेची मंजुरी घेणेकामी स्थायी समिती सभेची शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.सौ.शौमिका अमल महाडिक
अनुमोदक :- मा.अंबरिषसिंह संजय घाटगे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१७ :- कै.अशोक जयसिंग पाटील, सहा.गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हातकणंगले यांच्या शिल्लक अर्जित रजेचे रोखीकरणास मान्यता मिळणे बाबत. (सामान्य प्रशासन)**

**ठराव क्र. १८४** **दिनांक - १०/११/२०१७**

कै.श्री.अशोक जयसिंग पाटील, सहा.गट विकास अधिकारी, पं.स.हातकणंगले या पदावर कार्यरत होते. ते दिनांक ०९/०२/२०१७ रोजी मयत झाले आहेत. श्री.पाटील मयत होण्याच्या दिनांकास त्यांच्या सेवापुस्तकी ३०० दिवस इतक्या अर्जित रजा शिल्लक आहेत.

कै.श्री.पाटील यांच्या पत्नी श्रीम.मंदाकिनी अशोक पाटील रा.कराड ता.कराड जि.सातारा यांनी दिनांक ०५/०४/२०१७ च्या अर्जान्वये शासकीय लाभ मागणी केले आहेत.

कै.श्री.पाटील यांचे मृत्यु समयी त्यांचे रजा खात्यावर एकूण ३०० दिवस अर्जित रजा शिल्लक असलेने त्यांची पत्नी श्रीम.मंदाकिनी अशोक पाटील रा.कराड ता.कराड जि.सातारा यांचे दिनांक ०५/०४/२०१७ चे विनंती अर्जाप्रमाणे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील नियम १०९ (३) (ड) अन्वये मा. स्थायी समितीस असलेल्या अधिकारानुसार कै.श्री.अशोक जयसिंग पाटील, सहा.गट विकास अधिकारी, पं.स.हातकणंगले यांची ३०० दिवसांचे अर्जित रजा रोखीकरणास मंजुरी देण्यात येत आहे.

सुचक :- मा.श्री.विशांत सुरेश महापुरे
अनुमोदक :- मा.श्री.राहुल प्रकाश आवाडे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१८ :- सामान्य प्रशासन विभागाकडील लेखा विषयक नोंदवहया माहे जुन २०१७ ते ऑगष्ट २०१७ अखेरच्या लेखाविषयक नोंदवहया पुर्ण / अपुर्ण असले बाबत अवलोकन करणे. (सामान्य प्रशासन)**

**ठराव क्र. १८५** **दिनांक - १०/११/२०१७**

कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाकडील लेखा विषयक नोंदवहया माहे जून २०१७ ते ऑगष्ट २०१७ अखेर पर्यंत पूर्ण असले बाबत अवलोकन करण्यात आले, पूर्ण नोंदवहयांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | नमुना नं. | नोंदवही क्रमांक व तपशिल | कर्मचाऱ्याचे नांव | पूर्ण | अपुर्ण |
|---|---|---|---|---|---|
| १ | ११ | धनादेश प्राप्त नोंदवही (संबधीतांकडील सर्व योजनांची व खात्यांची) | श्री.रजनीकांत कांबळे<br>श्री.मधुकर आंधरे | पूर्ण | |

| अ.नं. | नमुना नं. | नोंदवही क्रमांक व तपशिल | कर्मचाऱ्याचे नांव | पूर्ण | अपुर्ण |
|---|---|---|---|---|---|
| २ | ७ | जनरल रोजकिर्द (संबधीतांकडील सर्व योजनांची व खात्यांची) | श्री.रजनीकांत कांबळे | पूर्ण | |
| ३ | ६ | जामिन कदबा नोंदवही | श्री.रजनीकांत कांबळे | पूर्ण | |
| ४ | ४ | पेटी कॅशबुक | श्री.रजनीकांत कांबळे | | |
| ५ | ३० | आकस्मिक खर्च नोंदवही | श्री.मधुकर आंधरे | पूर्ण | |
| ६ | १४ | खर्च नोंदवही | श्री.रजनीकांत कांबळे<br>श्री.निलेश म्हाळूंगेकर | पूर्ण | |
| ७ | ३२ | जंगम मालमत्ता नोंदवही | श्री.मधुकर आंधरे | पूर्ण | |
| ८ | ३७ | वाहन नोंदवही लॉगबुक | श्री.निलेश म्हाळूंगेकर | पूर्ण | |
| ९ | ३७ | वाहन हिस्ट्री बुक | श्री.निलेश म्हाळूंगेकर | पूर्ण | |
| १० | ३३ | साठा रजिस्टर | श्री.मधुकर आंधरे | पूर्ण | |

वरिल प्रमाणे नोंदवहया पूर्ण असलेने सदरच्या विषयास मंजूरी देणेत आली.

सुचक :- मा.श्री.कलाप्पा सतुराम भोगम
अनुमोदक :- मा.श्री.युवराज दत्ताजीराव पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१९ :- माहे सप्टेंबर २०१७ ची जमा खर्चाची प्रपत्र मजुंरी बाबत (अर्थ विभाग)**

**ठराव क्र. १८६** **दिनांक - १०/११/२०१७**

कोल्हापूर जिल्हा परिषदेची माहे सप्टेंबर २०१७ ची जमा व खर्चाची पत्रके अवलोकन करण्यात आली. वित्त समितीने माहे सप्टेंबर २०१७ च्या मासिक लेख्यांना दिनांक १३/१०/२०१७ चे सभेमध्ये केले शिफारशीनुसार त्यास मंजुरी देणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.राहुल प्रकाश आवाडे
अनुमोदक :- मा.सौ.शुभांगी रामचंद्र शिंदे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२० :- मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राखीव २०% निधीतील योजना सन २०१७-१८ मागासवर्गीय वस्तीतील समाजमंदिरात व्यायामाचे साहित्य पुरविणे या योजनेस प्रशासकिय मान्यता मिळणे बाबत. (समाजकल्याण विभाग)**

**ठराव क्र. १८७** **दिनांक - १०/११/२०१७**

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासननिर्णय क्रं. मागास १०९८/ प्र.क्रं.४१८/ २४ दि.१४/९/१९८९ मधील तरतूदीनुसार सर्व जिल्हा परिषदांनी त्यांच्या एकुण स्वउत्पन्नातील २०% निधी मागासवर्गीयांच्या कल्याण व पुर्नवसनाकरीता राखून ठेवावा व त्यातून मागासवर्गीय कल्याणासाठीच्या वैयक्तीक व सामुहिक लाभाच्या योजना राबवाव्यात असे निर्देश देण्यात आले आहेत.

उपरोक्त शासन निर्णयातील तरतूदीच्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्हा परिषदेने सन २०१७-१८ या चालू आर्थिक वर्षात खालील योजना हाती घेतली आहेत.

| अ.क्रं | योजनेचे नांव | तरतूद (आकडे रुपयात) |
|---|---|---|
| १ | मागासवर्गीय वस्तीतील समाजमंदिरात व्यायामाचे साहित्य पुरविणे | ४५,००,००० |

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र.झेडपी/ २०१२/प्र.क्र.६८०/वित्त-९, दिनांक १९ मार्च, २०१२ व शासन निर्णय क्र.झेडपीए/२०१२/प्र.क्र.६८०/वित्त-९, दिनांक ३१ जानेवारी, २०१३ अन्वये रुपये १०,००,०००/- पर्यंतच्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार खातेप्रमुखांना आहेत, रुपये १०,००,००१/- ते २०,००,०००/- पर्यंतच्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना रुपये २०,००,००१/- ते २३,००,०००/- पर्यंतच्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार विषय समितीच्या सभापतींना, रुपये २३,००,००१/- ते ३०,००,०००/- पर्यंतच्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार विषय समितीस, रुपये २५,००,००१/- ते ५०,००,०००/- पर्यंतच्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार स्थायी समितीस व ५०,००,००१/- व त्यापुढील रक्कमेच्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा परिषद, सर्वसाधारण सभेस आहेत. तसेच रुपये ५,००,००१/- ते १०,००,०००/- पर्यंतच्या योजनांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार खातेप्रमुखांना, रुपये १०,००,००१/- ते ५०,००,०००/- पर्यंतच्या योजनांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी/ मुख्य कार्यकारी अधिकारी यांना व रुपये ५०,००,००१/- व त्यावरील खर्चाच्या योजनांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार संबंधित प्रशासकीय विभागास किंवा अशा विभागाच्या अधिपत्याखालील राज्यस्तरीय आयुक्त/ राज्यस्तरीय संचालक यांना आहेत.सदर योजनेस प्रशासकीय मान्यता मिळण्याचा विषय दि.०४/१०/२०१७ च्या मा.स्थायी समितीच्या सभेत मंजूरीसाठी सादर करण्यात यावा असा ठराव मा.समाजकल्याण समितीच्या दि.२६/०९/२०१७ च्या बैठकीत करण्यात आला आहे.

कोल्हापूर जिल्हा परिषदेने मागासवर्गीयासाठी राखीव असलेल्या २०% निधीतून सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात हाती घेतलेल्या उपरोक्त योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार स्थायी समितीस आहेत.

| अ.क्र. | योजनेचे नाव | निकष, अटी व शर्ती |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | मागासवर्गीय वस्तीतील समाजमंदिरात व्यायामाचे साहित्य पुरविणे | १)ज्या गावामध्ये अनुसूचित जाती, नवबौध्द, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या वस्त्या आहेत अशाच गावातील संबंधित वस्तीमध्ये ही योजना राबविण्यात येईल.<br>२)सदरच्या वस्तीमध्ये समाजकल्याण विभागाच्या वा इतर कोणत्याही योजनेतून समाजमंदिर अथवा शासकीय इमारत झालेली असावी.<br>३)सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतीने समाजकल्याण विभागाकडे अर्ज करणे आवश्यक आहे.<br>४)या योजने अंतर्गत मंजूर अनुदानाची रक्कम डी.बी.टी व्दारे ग्रामपंचायतीच्या खाती जमा करण्यात येईल.<br>५) या योजने अंतर्गत समाजकल्याण समितीने निश्चित केलेल्या मानकानुसार ग्रामपंचायतीने विहित आर्थिक मर्यादेत साहित्य खरेदी करणे आवश्यक राहिल.<br>६) संबंधित वस्तीमध्ये यापुर्वी इतर कोणत्याही योजनेतून व्यायामाचे साहित्य मिळालेले नसावे. |

उपरोक्तप्रमाणे प्रस्तावीत केल्यानूसार सदर योजना सन २०१७-१८ या चालू आर्थिक वर्षात राबविण्यास स्थायी समितीची प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.श्री.राहुल प्रकाश आवाडे
ठराव सर्वानुमते मंजूर

**<u>चर्चेतुन करणेत आलेला ठराव</u>**

**विषय :- जिल्हा परिषद स्वनिधीतुन सुधारीत शवदाहिनी खरेदी करणे बाबत. (ग्रामपंचायत विभाग)**

**मा.राजवर्धन निंबाळकर:-** शवदाहीनी खरेदी करणे ही बाब ऐच्छिक ठेवा. शवदाहिन्या चोरीस जातात.

**मा.अरुणराव इंगवले:-** शवदाहिन्या मागणी प्रमाणे देण्यात याव्यात.

**ठराव क्र. १८८** **दिनांक - १०/११/२०१७**

कोल्हापूर जिल्हा परिषदेने स्वनिधीतुन सन १७-१८ चे मुळ अंदाजपत्रकात ग्रामपंचायत विभागास २५१५-१०३-संकीर्ण-अ २५१५ इतर ग्रामीण विकास कार्यक्रम अंतर्गत कोल्हापूर जिल्हयातील ग्राम पंचायतीना सुधारीत शवदाहिनी पुरविणेकरीता रक्कम रु.६०,००,०००/- (अक्षरी रु. साठ लाख फक्त) तरतुद मंजूर केलेली आहे. त्या मधून अंदाजे १०६ इतक्या सुधारित शवदाहिनी खरेदी करता येऊ शकतील.

जिल्हा वार्षिक योजनेतून तसेच अन्य योजनेतून ग्रामपंचायतीच्या स्मशानभूमीत बांधलेल्या स्मशानशेड मध्ये यापूर्वी शवदाहिनी पुरविणेत आलेली नाही अशा स्मशानशेड मध्ये जि.प. स्वनिधीतुन सुधारित शवदाहिनी पुरविणे करिता वरीलप्रमाणे तरतुद केलेली आहे. सदर तरतुदी मधुन खरेदी केलेल्या शवदाहिन्या अशाच ग्राम पंचायतीना सदरच्या शवदाहिनी पुरविणेत येतील.

त्याच प्रमाणे योजनेची मंजूर तरतूद रु ५० लक्ष पेक्षा जास्त असलेने सदर योजनेस तांत्रिक व प्रशासकीय मंजूरीचे अधिकार शासन निर्णय क्र.ZPA / २०१६ /प्र.क्र.५६/वित्त-९ दि.७ ऑक्टोंबर २०१७ नुसार जि.प.ला प्रदान केलेले आहेत. शवदाहिनी खरेदी करणेची ई निविदा प्रक्रिया राबविणेस व त्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व तांत्रीक मान्यता मिळणेकामी सदरचा विषय स्थायी समिती समोर ठेऊन स्थायी समितीची शिफारस घेऊन मंजुरी करिता जि.प.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे आवश्यक आहे.

त्यास अनुसरुन सदरचा प्रस्ताव दिनांक १०.११.२०१७ इ. रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये चर्चा होऊन सदरचा प्रस्ताव अंतीम मान्यतेसाठी जिल्हा परिषद, सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस ठेवणेस स्थायी समिती सभेची शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.श्री.जयवंत गुंडोपंत शिंपी
ठराव सर्वानुमते मंजूर

**<u>चर्चेतुन करणेत आलेला ठराव</u>**

**विषय:- मागासवर्गीयासाठी राखीव २०% सेसफंडातील उत्पन्न मर्यादा वाढविणे बाबत. (समाजकल्याण विभाग)**

**मा.उपाध्यक्ष:-** समाजकल्याण विभागाकडील वैयक्तीक लाभाच्या योजनेचा लाभ मिळणे कमी संबधित लाभार्थ्यांच्या उप्तन्नाची मर्यादा रु.५०,०००/- वरून रु.१.०० लक्ष करणेत यावी.

**मा.सभापती (समाजकल्याण):-** होय सदर उत्पन्नाची अट कमी करून तसा ठराव करूया.

**ठराव क्र. १८९** **दिनांक - १०/११/२०१७**

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या शासन निर्णय क्र. मागास १०९८/ प्र.क्र.७८/ ३४ दि.२०/१०/१९९९ मधील तरतूदीनुसार मागासवर्गीयांसाठी राखीव २०% सेसफंडातुन सर्व जिल्हा परिषदांनी त्यांच्या एकुण स्वउत्पन्नातील २०% निधी मागासवर्गीयांच्या कल्याण व पुर्नवसनाकरीता राखून ठेवावा व त्यातून मागासवर्गीय कल्याणासाठीच्या वैयक्तीक व सामुहिक लाभाच्या योजना राबवाव्यात असे निर्देश देण्यात आले आहेत.

सदर शासन निर्णयातील तरतूदीच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या एकूण उत्पन्नातील २०% निधी मागासवर्गीय कल्याणसाठी राखून ठेवण्यात येतो व त्यातून विविध योजना राबविण्यात येतात. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात सदर निधीमधून विविध योजना डी.बी.टी प्रक्रियेव्दारे राबविण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या शासन निर्णय क्र. मागास २००१/ प्र.क्र.४०८/ ३४ दि.२०/०४/२००१ मधील तरतूद क्र. २ नुसार स्थानिक संदर्भानुसार कुटुंबाच्या उत्पन्नाची कमाल मर्यादा निश्चित करण्याचे अधिकार मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेस आहेत.

२०% सेसफंडातील योजनांसाठी सन २०१६-१७ व त्यापूर्वीपासून कुटुंबाची उत्पन्न मर्यादा रुपये ५०,०००/- इतकी विहित करण्यात आली आहे. हीच उत्पन्न मर्यादा सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी विहित करण्यात आली आहे. मात्र मा. समाजकल्याण समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, रुपये ५०,०००/- च्या आतील उत्पन्नाचा दाखला मिळण्यासाठी बऱ्याच अडचणी येतात. संबंधित तलाठी रुपये ५०,०००/- च्या आतील दाखला देण्यास टाळाटाळ करतात. त्यामुळे आर्थिकदृष्टया दुर्बल असूनही अनेक लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहू शकतात. याबाबतीत समाजकल्याण समितीच्या दिनांक २५/१०/२०१७ च्या बैठकीत सविस्तर चर्चा होवून सदर उत्पन्न मर्यादा रुपये ५०,०००/- वरुन १,००,०००/- इतकी करण्याचा ठराव क्रमांक १९ करण्यात आला आहे. मात्र सदर उत्पन्न मर्यादा वाढविण्याचे अधिकार मा.जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेस असल्याने याबाबत आजच्या स्थायी समिती सभेमध्ये चर्चा होवून चालू वर्षातील योजनांसाठी रुपये ५०,०००/- ही उत्पन्न मर्यादा वाढवून ती कमाल १,००,०००/- रुपये करावी अशी शिफारस करण्यात येत आहे. सदर विषय मान्यतेकामी जिल्हा परिषदेच्या आगामी सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

सुचक :- मा.श्री.विशांत सुरेश महापुरे
अनुमोदक :- मा.श्री.सर्जेराव ज्ञानदेव पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**मा.राहुल आवाडेः-** समाजकल्याण व महिला व बाल कल्याण विभागाकडील वैयक्तीक लाभाच्या योजनांचे फॉर्म झेरॉक्स करून विक्रीस ठेवले आहेत व यामधुन पैसे मिळविले जातात.

**समाजकल्याण अधिकारी :-** सदरचे फॉर्म विनामुल्या आहेत.

**मा.मु.का.अ.:-** शेवटी लाभार्थी निवड समितीने करावयाची आहे.

**मा.राहुल आवाडेः-** कोराची ग्रा.पं. इमारतीमध्ये तालिम आहे. ग्रा.पं. ने ठराव केलेस व्यायाम साहित्य मिळणार काय?

**समाजकल्याण अधिकारी :-** तेथे मागासवर्गीय वसाहत पाहिजे.

**मा.अरुणराव इंगवलेः-** यासाठी रक्कम रु.४५.०० लक्ष इतके बजेट आहे. तुमच्या स्तरावर याची खरेदी करावी.

**समाजकल्याण अधिकारी :-** सर्व साधारणता एक सदस्याला एक काम मिळेल.

**मा.राहुल आवाडेः-** ग्रामपंचायत टेंडर करणार काय.?

**समाजकल्याण अधिकारी :-** साहित्य खरेदी करून पावती देणार.

**मा.राहुल आवाडेः-** जिल्हा क्रिडा अधिकारी यांच्या पध्दती प्रमाणे खरेदी करावी.

**मा.अरुणराव इंगवलेः-** तसा प्रस्ताव क्रिडा मंडळाला पाठविला आहे काय?

**समाजकल्याण अधिकारी :-** नाही.

**मा.मु.का.अ.:-** या बाबत अति.मुख्य कार्यकारी अधिकारी तपासणी करतील व कार्यवाही करतील.

**मा.सभापती (म.बा.क.):-** उदगांव ता.शिरोळ येथील नळ योजनेच्या अंदाजपत्रकाचे काय झाले ?

**कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.):-** अंदाजपत्रक तयार झाले असून मंत्रालयस्तरावर सादर होईल.

**मा.राजवर्धन निंबाळकर:-** कोडीग्रे व जैनापुर येथील टेंडर बाबत अध्यापही कार्यवाही का झाली नाही.

**कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.):-** दोन दिवसात निविदा ओपन करतो. या दोन्ही गावातील पुर्ण होत आहे.

**मा.सभापती (शिक्षण व अर्थ):-** शासनाने ऊस वाण संप्रेरकावर बंदी घातली आहे याचा पुर्नविचार व्हावा.

**कृषि अधिकारी:-** यास शासनाने बंदी घातली आहे या बाबत शासनाकडे आपल्या भावना कळवूया.

**मा.अरुणराव इंगवले:-** श्री.शिवाजीराव मोरे, जि.प. सदस्य यांनी पैजारवाडी ता.पन्हाळा येथील कै.हिरवे गुरुजी यांची टेलिफिल्म शाळांमध्ये दाखविणे बाबत मागणी केली आहे.

**मा.सभापती (शिक्षण व अर्थ):-** सदरची टेलीफिल्म आम्ही (शिक्षण समिती) पहातो व तद्नंतर बघुया.

**मा.अरुणराव इंगवले:-** जिल्हा परिषदेच्या मालमत्ता देखभाली कामी मालमत्ता अधिकारी नेमणूक करावयाचा होता या बाबत काय झाले?

**कार्यकारी अभियंता (बांधकाम):-** याबाबतची मिटींग अध्याप झालेली नाही.

**मा.अरुणराव इंगवले:-** या बाबत तात्काळ कार्यवाही होणेची आवश्यकता आहे.

**कार्यकारी अभियंता (बांधकाम):-** या करीता श्री.शिंदे व श्री. कबुरे या दोन सेवा निवृत्त उप अभियंता यांचे अर्ज प्राप्त झाले आहेत.

**मा.सभापती (शिक्षण व अर्थ):-** जिल्हा परिषदेच्या मालमत्ता शहरी व ग्रामिण या प्रमाणे वर्गवारी करून या दोघांना नेमणूक करणे योग्य होईल.

**मा.मु.का.अ.;-** दोघांना नेमलेस त्यांच्या मानधनाचे काय?

**मा.अरुणराव इंगवले:-** या बाबत परफॉर्मन्स बघून कार्यवाही करा.

**मा.उपाध्यक्ष:-** कामकाजाची पध्दत बघून ठरविणेत यावे. हसुर प्रा.आ.केंद्राच्या जागे बाबत कोर्ट केसचे काय झाले ?

**कार्यकारी अभियंता (बांधकाम):-** कोर्ट केस पुर्वी एन.सी.घेतली आहे.

या नंतर घनकचारा व्यवस्थापना कामी कुलकर्णी पॉवर टुल्स लि. शिरोली कोल्हापूर यांच्या मार्फत तयार करणेत आलेल्या घनकचरा व्यवस्थापन घंटागाडीची सविस्तर माहिती सभागृहास दिली. व या बाबत पुढील प्रमाणे चर्चा झाली.

**मा.मु.का.अ.:-** हि घनकचरा व्यवस्थापन घंटागाडी चौदाव्या वित्त आयोग निधीतुन ग्रामपंचायतीनी खरेदी केलेस योग्य होईल.

**प्रतिनिधी (कुलकर्णी पॉवर टुल्स):-** या घंटागाडीस सहा एक्साईड कंपनीच्या बॅटऱ्या असून सांडपाणी शुध्दीकरण व प्रदुषन मुक्त उपकरण असलेने व येणारा खर्चही अत्यल्प असलेने घनकचरा व्यवस्थापनास हे वाहन कसे उपयुक्त आहे.

**मा.अरुणराव इंगवले:-** यासाठी जिल्हा ग्रामनिधी व जिल्हा स्वनिधीमध्ये तरतुद करावी.

**मा.राहुल आवाडे:-** इच्छा असलेस स्वनिधी मधुन दयावेत.

**मा.अध्यक्ष:-** या उपकराणामध्ये कंपार्टमेंट करणेत यावे.

**मा.राजवर्धन निंबाळकर:-** ड्रायव्हरसीट साठी संरक्षणाची व्यवस्था करावी.

यानंतर मा.उपाध्यक्ष यांनी सभेस उपस्थित असलेल्या सर्व पदाधिकारी, सदस्य, सर्व अधिकारी व खाते प्रमुख यांचे सभा खेळीमेळीत चालवणेस सहकार्य केले बद्दल सर्वांचे आभार मानून मा.अध्यक्षांच्या परवाणगीने सभा संपलेचे जाहीर केले.

कार्यवृत्तांत वाचला आणि कायम केला दिनांक १०/११/२०१७

| | |
|---|---|
| **(आर.बी.भालेराव)** | **(शौमिका महाडिक)** |
| **सचिव तथा** | **सभापती स्थायी समिती तथा** |
| **उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)** | **अध्यक्ष** |
| **जिल्हा परिषद, कोल्हापूर** | **जिल्हा परिषद,कोल्हापूर** |